सद्रक्षणाय खलोनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
**पोलीस विभाग**
वार्ताहर कक्ष,
पोलीस आयुक्त, यांचे कार्यालय,
डॉ. डी. एन. रोड, मुंबई-४००००१.

दूरध्वनी क्र. २२६२०३३२
Email I.D. – pressroom.mum@mahapolice.gov.in

जा.क्र. ६१० /वार्ता.कक्ष/२०२१ दिनांक :- १९ /११/२०२१

## —: प्रेस नोट :—

## —:निर्भया पथक कामगिरी:—

ट्रॉम्बे पोलीस ठाणे, मुंबई दिनांक १७/११/२०२१ रोजी रात्रपाळी ठाणे अंमलदार यांना फिर्यादी महिला यांनी येऊन कळवले की त्यांची अल्पवयीन मुलगी ही दिनांक १७/११/२०२१ रोजी १८.०० वा. घरातून प्रार्थनेसाठी जाते असे सांगून घराबाहेर पडली आणि अद्याप पर्यंत घरी आली नाही. म्हणून रात्रपाळी पर्यवेक्षक स. पो. नि. गावशेते यांच्या मार्गदर्शनाखाली निर्भया पथक व गुंडा विरोधीपथकासह हरवलेल्या मुलीचा चिता कॅम्प, मानखुर्द, भीमनगर परिसर येथे शोध घेत असताना दिनांक १८/११/२०२१ रोजी रात्री ०१.४५ वाजताच्या दरम्यान सदर मुलगी ही मानखुर्द स्टेशन येथे मिळून आली तिला ताब्यात घेऊन पोलीस ठाणेस आणून तिच्याकडे ती कुठे निघून गेली याबद्दल विचारणा केली असता ती अभ्यास करण्याचे कारण सांगून इंस्टाग्राम वापरते व मित्र मैत्रिणी सोबत चॅटिंग करते म्हणून आई रागावल्याने प्रार्थनासाठी जाते असे सांगून कुणालाही काहीही न सांगता निघून गेली होती. तिच्यासोबत काहीही आक्षेपार्ह घडलेले नाही. सदर मुलीला सुखरूप आईवडिलांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर निर्भया पथक व गुंडा विरोधीपथक ट्रॉम्बे पोलीस ठाणे, मुंबई मधील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी प्रशंसनीय कामगिरी केली आहे.

(चैतन्या एस.)
पोलीस उप आयुक्त (अभियान),
जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय, मंबई

Scanned with CamScanner